रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपेच्या कारणाने नोकरी देण्याबाबतच्या सूचना देणारे दिनांक १५ ऑक्टोबर,१९८६ चे पत्र क्र.एलएपी १०८६/(१३३/८६)/आ (का) रद्द करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१२/२०२०/आ (काम)

जलसंपदा विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,

मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक :- २१ डिसेंबर, २०२०

**संदर्भ :-** पत्र क्र.एलएपी/१०८६/(१३३/८६)/आ (का), दिनांक १५ ऑक्टोबर, १९८६

**प्रस्तावना:-**

रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपेच्या कारणाने नोकरी देण्याबाबतच्या सूचना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१०८४/१८९/सीआर-१५५/तेरा-अ, दिनांक ८ मार्च, १९८५ च्या शासन निर्णयास अनुसरुन संदर्भाधीन पत्रान्वये तत्कालीन परिस्थिती विचारात घेऊन शासनाकडून देण्यात आल्या होत्या. अनुकंपा वरील नियुक्त्या ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीत येत असून त्यांनी अनुकंपाबाबत दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक यांचे एकत्रिकरण करुन सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ८ मार्च, १९८५ च्या शासन निर्णयास अधिक्रमित करण्यात आले असल्याने दिनांक १५ ऑक्टोबर,१९८६ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना रद्द करण्याबाबतचे आदेश निर्गमित करावयाच्या सुचना सामान्य प्रशासन विभागाने दिल्या आहेत. त्यानुसार संदर्भाधीन परिपत्रक रद्द करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

रुपांतरीत स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपेच्या कारणाने नोकरी देण्याबाबतच्या सूचना शासन पत्र क्र. एलएपी/१०८६/(१३३/८६)/आ (का), दिनांक १५.१०.१९८६ अन्वये देण्यात आल्या होत्या. सदर पत्र या परिपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(कैलास बिलोणीकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व मुख्य अभियंता,

२. सर्व अधीक्षक अभियंता,
३. कार्यासन आस्था (तांत्रिक), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. कार्यासन आस्था (अतांत्रिक), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. निवडनस्ती, कार्यासन आस्था (कामगार), जलसंपदा विभाग.